वैचारिक क्रांतीचा अग्रदूत

# देशोन्नती

अकोला बुधवार, दि. २२ जून २०२२ पृष्ठे ६+८ =१४ मूल्य ₹:६

## सेवाधर्म मल्टीपर्पज सोसायटी अकोला

एमजीओ फेडरेशन व सेवाधर्म शिक्षण व बहुउदेशिय संस्था यांच्या वतीने २१ जून रोजी स्थानिक रणपिसे नगरातील श्री बारा ज्योतिर्लिंग मंदिर हॉल या ठिकाणी महिलांसाठी आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या निमित्ताने योगाभ्यासाचा प्रचार आणि प्रसाराचे महत्त्व जनसामान्यांना समजावे, जनजागृती व्हावी यासाठी महा एंनजीओ फेडरेशनचे शेखर मुंडा यांच्यां संकल्पनेतून योग यज्ञ या उपक्रमांतर्गत योग शिबिर आयोजित करण्यात आले होते. यावेळी दिप प्रज्वलन वनिता राऊत यांनी केले. यावेळी योग प्रशिक्षक रेखा वानखडे, मीरा घुगे, वनिता कदम, राजश्री देशमुख, कल्पना देशमुख, अस्मिता देशमुख, लता देशमुख यांच्यासह महिलांची उपस्थिती होती. २१ जून जागतिक योग दिनानिमित्त नागरिकांना योग-प्राणायाम विषयी प्रशिक्षित करण्यासाठी या उपक्रमाचे आयोजन मुख्य संयोजक म्हणून महा एनजीओ फेडरेशनचे संस्थापक शेखर मुंदडा व विशेष सहकार्य चंद्रकांत राठी, महा पनिजओ फेडरेशनचे मुकुंद शिंदे, अक्षय महाराज, ललिता वाघ व संचालक मंडळ यांचे मार्गदर्शन लाभले.

सकाळ | अकोला
अकोला, बुधवार, २२ जून २०२२
TODAY
SakalNews @SakalMediaNews www.esakal.com Call Centre : 9225800800

## रणपिसेनगरात योग यज्ञ शिबिर उत्साहात



**अकोला :** महा एनजीओ फेडरेशन, सेवाधर्म शिक्षण व बहुउदेशीय संस्था यांच्या वतीने ता. २१ जून रोज़ी शहरातील बारा ज्योतिर्लिंग मंदिर सभागृहात योग दिनानिमित्त योगाभ्यासाचे महत्त्व जनसामान्यांना समजावे, जनजागृती व्हावी यासाठी शेखर मुंदडा यांच्या संकल्पनेतून योग शिबिराचे आयोजन करण्यात आले. दीप प्रज्वलन श्रीमती वनिता राऊत यांनी केले. यावेळी योग शिक्षिका रेखा वानखडे, मीरा पुणे, राजश्री देशमुख, कल्पना देशमुख; अस्मिता देशमुख, लता देशमुख उपस्थित होते. मुकुंद शिंदे, अक्षय महाराज, मनित वाघ व संचालक मंडळ यांनी परिश्रम घेतले.

आप पढ़ रहे हैं देश का सबसे विश्वसनीय और नंबर 1 अखबार

# दैनिक भास्कर

अकोला बुधवार, 22 जून, 2022


## सेवा धर्म संस्था



महा.एनजीओ फेडरेशन व सेवाधर्म शिक्षण व बहुउद्धेशीय संस्था की ओर से विश्व योग दिन का आयोजन श्री बारा ज्योतिर्लिंग मंदिर हॉल में महिलाओं के लिए किया गया। कार्यक्रम की शुरुआत दीप प्रज्वलन से की गई। दीप प्रज्वलन वनिता राऊत ने किया। योग भारत ने विश्व को दिया है। योग से रोग प्रतिकार शक्ति बढ़ती है। योग शिक्षिका रेखा वानखडे ने मार्गदर्शन करते हुए कहा कि शरीर को निरोगी रखने के लिए सबसे प्रभावी योग है सूर्यनमस्कार जिससे शरीर लचीला बनता है। रक्तप्रवाह भी अच्छा होता है। इस समय मीरा घुगे, वनिता कदम, राजश्री देशमुख, कल्पना देशमुख, अस्मिता देशमुख, लता देशमुख आदि महिलाओं की उपस्थिति रही। विश्व योग दिवस के अवसर पर नागरिकों को योग प्राणायाम विषयी प्रशिक्षित करने के लिए इस उपक्रम का आयोजन मुख्य संयोजक महा एनजीओ फेडरेशन के संस्थापक शेखर मुंदडा व विशेष सहकार्य चंद्रकांत राठी, मुकुंद शिंदे, अक्षय महाराज, ललित वाघ व संचालक मंडल ने किया।


महाराष्ट्रातील एकमेव स्वतंत्र दैनिक
अजिंक्य भारत
अकोला, गुरुवार, दि. २३ जून २०२२ www.ajinkyabharat.in वर्ष १६,

# बारा ज्योतिर्लिंग मंदिर सभागृहात महिलांसाठीचे योगयज्ञ शिबिर थाटात

**अकोला, दि. २२ प्रतिनिधी**

महा एनजीओ फेडरेशन, सेवाधर्म शिक्षण व बहुउद्धेशिय संस्था यांच्या वतीने २१ जून रोजी श्री बारा ज्योतिर्लिंग मंदिर हॉल रणपिसे नगर अकोला या ठिकाणी महिलांसाठी आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या निमित्ताने योगाभ्यासाचा प्रचार आणि प्रसार व्हावा यासाठी एनजीओ फेडरेशनचे शेखर मुंदडा यांच्या संकल्पनेतून योग यज्ञ या उपक्रमांतर्गत योग शिबिर आयोजित करण्यात आले होते.

योगामुळे शरीराच्या सर्व क्रिया कल्पावर देखील नियंत्रण मिळते. शरीर निरोगी होते, रक्तप्रवाह नियंत्रित केला जातो. शरीरातील



हानिकारक विष काढून टाकते. शरीराचे विकार दूर होतात आणि रुग्णांना त्यातून आराम मिळतो. योगाचे सर्वात प्रभावी स्वरूप म्हणजे सूर्यनमस्कार त्यामुळे शरीरात लवचिकता येते , रक्तप्रवाह चांगला होतो. दीप प्रज्वलन वनिता७ राऊत यांनी केले .

यावेळी योग शिक्षिका सौ . रेखा वानखडे , सौ मीरा घुगे , वनिता कदम , राजश्री देशमुख , सौ कल्पना देशमुख , अस्मिता देशमुख , लता देशमुख सह महिलांची उपस्थिती होती. फेडरेशनचे संस्थापक शेखर मुंदडा व विशेष सहकार्य चंद्रकांत राठी,महा एनिजओ फेडरेशनचे मुकुंद शिंदे , अक्षय महाराज , ललित वाघ व संचालक मंडळ यांचे मार्गदर्शन लाभले.

महासागर

सोमवार, दि. २५ जुलै २०२२

अकोला

पान ३

## उत्कर्ष शिशुगृहात दहा दिवसांचे बालक दाखल

अकोला, दि. २४ : बाल कल्याण समिती अकोला यांच्या आदेशान्वये २१/०७/२०२२ रोजी सायंकाळी ७.३० वाजता उत्कर्ष शिशुगृह बसेरा कॉलनी मलकापूर जि. अकोला या संस्थेत एक बालक दाखल झाला आहे. या बालकाचे सध्याचे वय १० ते ११ दिवसाचे असून हे बाळ दि. १२/०७/२०२२ रोजी रात्री ८.३० च्या सुमारास मौजे दुधाळा ता. मालेगाव जि. वाशिम येथे मोकळ्या जागेत आढळून आले. त्या बालकाला बाल कल्याण समिती अकोला यांच्या आदेशान्वये उत्कर्ष शिशुगृह बसेरा कॉलनी, मलकापूर अकोला येथे प्रवेशित करण्यात आले. त्या बालकाचे कोणी पालक अथवा नातेवाईकांनी अधिकृत पुराव्यासह उत्कर्ष शिशुगृह बसेरा कॉलनी अकोला तसेच जिल्हा बाल संरक्षण कक्ष यांच्याशी आजपासून ६० दिवसांच्य आत संपर्क साधावा.

मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

e-mail : nagpurpost@gmail.com • mahasagarngp@gmail.com

सोमवार, दिनांक २५ जुलै २०२२ | ८ पाने • किमत रू. २/-+ बितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)


## देवेंद्र फडणवीस यांच्या ५२ व्या वाढदिवसानिमित्त राज्यभर वृक्षारोपण



**अकोला, दि. २४ :** महाराष्ट्र राज्याचे लाडके उपमुख्यमंत्री व महा एनजीओ फेडरेशनचे ज्येष्ठ मार्गदर्शक आदरणीय श्री. देवेंद्रजी फडणवीस यांचा वाढदिवस २२ जुलै २०२२ रोजी वृक्षारोपण या मोहिमेद्वारे महा एनजीओ फेडरेशन यांच्या सहकार्याने अकोला शहराच्या मलकापूर परिसरातील दिपाली नगरात साजरा झाला . या वेळी तृप्ती फॅब्रिकेशन चे संचालक व परिसरातील नागरिक उपस्थित होते. या निमित्ताने महा एनजीओ फेडरेशन व राज्यभरातील संलग्न असलेल्या एनजीओच्या वतीने वृक्ष लागवड संकल्प करण्यात आला होता व आमच्या सर्व सामाजिक स्वयंसेवी संस्थांनी यात सहभाग घेत उत्तमरित्या महा एनजी फेडरेशनचे संस्थापक व ज्येष्ठ समाजसेवक शेखर मुंदडा यांनी दिली. चंद्रकांत राठी यांचे विशेष मार्गदर्शन व सहयोग या उपक्रमांस लाभला. मानव आणि निसर्ग यांच्यात जुना संबंध आहे. या निसर्गातूनच मानवाचा जन्म झाला आहे. मानव या निसर्गातूनच जन्माला आला, वाढला आणि इथेच विलीन सुद्धा झाला. या निसर्गातून मानवाला अनेक गोष्टी या मिळू लागल्या. म्हणून त्याचे जीवन जगणे अत्यंत सोपे झाले. तसेच झाडे ही पर्यावरणाचा एक महत्वाचा घटक आहेत. झाडांचा मानवाच्या जीवनात खूप महत्त्व आहे. जंगले आणि वने ही निसर्गाच्या उत्तम सौदर्याचा साठा आहेत. या जंगलांमधून पोसणारे निसर्गाचे स्वरूप हे मानवाला प्रेरित करते. जर या धरतीवर वन किंवा जंगल नसतील तर मानवाला आपले जीवन जगणे कठीण आहे. वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे अशा ओळींच्या माध्यमातुन संत तुकाराम महाराजांनी वृक्षांचे महत्त्व समाजाला समजाऊन सांगितले.


साप्ताहिक
महाराष्ट्र शासनाच्या जाहीरात यादीवरील नारी शक्तीचा आवाज बुलंद करणारे वृत्तपत्र
# नारी ललकार
संपादकः पंजाबराव बकाराम वर, मोः 9922924684 | Postal Regd. AKL/DN/196/2021-23
सोमवार दि. २५ जुलै २०२२ ■ पृष्ठ ४ ■ किंमत २ रुपये ■ RNI NO.MAH-BIL/2014/63081

## लोकनेते देवेंद्रजी फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त महा एनजीओ फेडरेशन द्वारे राज्यभरात वृक्षारोपण !




**अकोला :** महाराष्ट्र राज्याचे लाडके उपमुख्यमंत्री व महा एनजीओ फेडरेशनचे ज्येष्ठ मार्गदर्शक आदरणीय श्री. देवेंद्रजी फडणवीस यांचा वाढदिवस २२ जुलै २०२२ रोजी वृक्षारोपण या मोहिमेद्वारे महा एनजीओ फेडरेशन याच्या सहकार्याने अकोला शहराच्या मलकापूर परिसरातील दिपाली नगरात साजरा झाला . या वेळी तृप्ती फॅब्रिकेशन चे संचालक व परिसरातील नागरिक उपस्थित होते . या निमित्ताने महा एनजीओ फेडरेशन व राज्यभरातील संलग्न असलेल्या एनजीओच्या वतीने वृक्ष लागवड संकल्प करण्यात आला होता व आमच्या सर्व सामाजिक स्वयंसेवी संस्थांनी यात सहभाग घेत उत्तमरित्या महा एनजी फेडरेशनचे संस्थापक व ज्येष्ठ समाजसेवक शेखर मुंदडा यांनी दिली.चंद्रकांत राठी यांचे विशेष मार्गदर्शन व सहयोग या उपक्रमांस लाभला. मानव आणि निसर्ग यांच्यात जुना संबंध आहे. या निसर्गातूनच मानवाचा जन्म झाला आहे. मानव या निसर्गातूनच जन्माला आला, वाढला आणि इथेच विलीन सुद्धा झाला. या निसर्गातून मानवाला अनेक गोष्टी या मिळू लागल्या. म्हणून त्याचे जीवन जगणे अत्यंत सोपे झाले. तसेच झाडे ही पर्यावरणाचा एक महत्वाचा घटक आहेत. झाडांचा मानवाच्या जीवनात खूप महत्त्व आहे. जंगले आणि वने ही निसर्गाच्या उत्तम सौंदर्याचा साठा आहेत. या जंगलांमधून पोसणारे निसर्गाचे स्वरूप हे मानवाला प्रेरित करते. जर या धरतीवर वन किंवा जंगल नसतील तर मानवाला आपले जीवन जगणे कठीण आहे. वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे अशा ओळींच्या माध्यमातुन संत तुकाराम महाराजांनी वृक्षांचे महत्त्व समाजाला समजाऊन सांगितले. महा एनजीओ फेडरेशन संतांच्या विचारांतून प्रेरणा घेऊन सतत समाजाच्या सेवेत गुंतलेला असतो. आदरणीय देवेंद्र फडणवीस जी यांचा वाढदिवस वृक्षारोपण करून साजरा करण्याचा निर्धार महा एनजीओ फेडरेशनच्या वतीने करण्यात आला होता व यामध्ये संपूर्ण महाराष्ट्रातून ५२ संस्था सहभागी झाल्या आहेत.

# राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण वृक्षारोपण अभियानमध्ये सेवाधर्म संस्थेचा सहभाग



**अकोला:** राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण च्या वतीने अकोला पातूर रोडवरील चिखलगाव राष्ट्रिय महामार्ग क्र.१६१ या चिखलगाव ते कापशी रोड दरम्यान वृक्षारोपण करण्यात आले.

वृक्षारोपनास प्रमुख उपस्थिती सन्माननीय श्रीमती निमा अरोरा (जिल्हाधिकारी अकोला) डॉ.विलास भाले (कुलगुरू डॉ पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला), श्री.सौरभजी कटियार (मुख्य कार्यकारी अधिकारी) जिल्हा परिषद अकोला , कर्नल चंद्रप्रकाश भदोला CEO,NCC, श्री. के. अर्जुना (उपवनसंरक्षक, अकोला), तुषार हांडे, उपवनासंरक्षक के. अर्जुना, उपविभागीय अधिकारी डॉ निलेश अपार, एन.सी.सी. चे, कर्नल चंद्रप्रकाश भदोला, मोंटे कार्ले कंपनीचे प्रकल्प व्यवस्थापक सुरेंद्र धिमन, काशिनाथ तिवारी, मनोज यादव, तेजराव थोरात, कापशी सरपंच अंबादास उगाळे, चिखलगाव सरपंच, वनपरिक्षेत्र अधिकारी धीरज मदने,पि एस आय हर्षु रत्नपारखी पोलीस उप निरीक्षक मजिद पठाण, सूवर्ण नदी पुनरुज्जीवन प्रकल्प संचालक डॉ सचिन कोकाटे, ॲड मुरलीधर इंगळे, आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते. भारतातील राष्ट्रीय महामार्गावर स्वातंत्र्य दिनाच्या अमृत महोत्सव निमित्ताने वृक्ष लागवड कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. सेवाधर्म शिक्षण व बहुउद्धेशिय संस्था या अभियानात सहभागी झाली आहे. तसेच सन्माननीय नागरिक, शाळा व शिक्षण संस्था, राष्ट्रीय सेवा योजना (NSS), NCC, डॉक्टर, वकील तथा समाजसेवींना आमंत्रित करण्यात आले होते.




राष्ट्रीय महामार्ग १६१. या मार्गावरील कापशी ते चिखलगाव येथे दिनांक १७/ ७/ २०२२ रविवारला सकाळी ठीक नऊ वाजता हा महत्त्वाकांक्षी कार्यक्रम राबविला आहे.

द्यायचं आहे अपेक्षांच्या पलीकडचं...!


# अजिंक्य भारत

pm

अकोला, शुक्रवार, दि. २ डिसेंबर २०२२ www.ajinkyabharat.in वर्ष १७, अंक १३३ । पृष्ठे ८+४

## यावलखेड, वरोडी, सांगळुद, धोतर्डी या गावाचा समावेश

# शाश्वत शेती तंत्रज्ञानासाठी चार गावांची निवड



**अकोला, दि. १ प्रतिनिधी**

**हवामानानुकूल - अल्पखर्चिक शाश्वत तंत्रज्ञान राबविण्यासाठी जिल्हा निहाय संस्थांची निवड केली असून सेवाधर्म शिक्षण व बहुउयुद्धेशिय संस्था अकोला या संस्थेने यावलखेड, वरोडी, सांगळुद व वरोडी या चार गावात अफार्म चे अध्यक्ष प्रमोद देशमुख, कार्यकारी संचालक सुभाष तांबोळी, प्रकल्प संचालक एस. एन. साकोरे यांच्या मार्गदर्शनाखाली हे अभियान ऑक्टोबर २०२२ ते सप्टेंबर** २०२४ दरम्यान राबविण्यात येणार आहे.

या साठी सेवाधर्म संस्था चे अध्यक्ष प्रा. धनंजय कोठाले व सचिव तुषार हांडे यांचे सह समस्त संचालक मंडळ कार्यरत आहेत.महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील ७० टक्के जन समुदायाची उपजीविका शेती व शेती सलग्न व्यवसायावर अवलंबून आहे, तथापि घटलेली उत्पादकता, एक पीक पध्दतीचा वापर, उत्पादन खर्चातील वाढ, अपुरा व त्रोटक वित्त पुरवठा, काढणी पश्चात प्रक्रिया व कृषी माल मूल्यवर्धनाचा , शेतीतील व्यवसायिक तेचा अभाव, बाजार भावातील अनिश्चितता, शेतीला जोड धंद्याचा अभाव, असंघटित शेतकरी तसेच अल्प खर्चिक शेती तंत्रज्ञान कोरडवाहू अल्पभूधारक शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यात कृषी विस्तार यंत्रणाना लागत असलेला वेळ, कृषी विषयक शासकीय योजना अंमलबजावणी मध्ये होत असलेली दिरंगाई, लहरी पाऊस इत्यादी कारणामुळे शेती व शेती संलग्न व्यवसाय किफायतशीर होतांना दिसत नाही. पर्यायाने ग्रामीण कुटुंबातील पिढीजात कृषी व्यवसाय मधून बाहेर पडून बिगरशेती रोजगाराशी संबंधित संधीच्या शोधात शहरा कडे वळताना दिसून येतो. या पाश्र्वभूमीवर महाराष्ट्रातील लहान व अल्प भूधारक , अदिवासी महिला शेतकरी यांना केंद्र स्थानी ठेऊन ग्रामीण कुटुंबाची उपजीविका सक्षम करण्यासाठी अफार्म मार्फत हवामान अनुकूल शेती एकात्मिक कृषी प्रणाली मजबूतीकरण व कृषी उद्योजकता विकास इत्यादी उपक्रम हाती घेण्यात आले आहेत. या अंतर्गत महाराष्ट्रातील कोरडवाहु भागातील छोट्या, अल्प भूधारक शेतकऱ्यांसाठी काम करणाऱ्या निवडक अफार्म सदस्य व इतर संस्थेच्या कार्यकर्त्यांचे अल्प खर्चिक शेती तंत्रज्ञान विषयी क्षमता वर्धन व्हावे व त्यांच्या माध्यमातून कोरडवाहू भागातील छोट्या, अल्प भूधारक शेतकऱ्या पर्यंत अल्प खर्चिक शेती तंत्रज्ञान पोहोचावे यासाठी आखणी करण्यात आली आहे. पावसाच्या पाण्यावर अवलंबून असलेल्या शेतीचे उत्पन्न वाढी साठी बदलत्या हवामानानुसार , कमी खर्चात जास्त उत्पादन मिळविण्यासाठी जमिनीतील ओलावा संवर्धन पद्धती, मातीचे आरोग्य सुधारण्यास मदत, स्थानिक वनस्पती संरक्षण उपाय, एकात्मिक पोषक आणि कीटक व्यवस्थापन, सेंद्रीय शेतीसाठी पशुधन संगोपनाची गरज आदी प्रमुख विषयावर ॲक्शन फॉर अग्रीकल्चर रिन्यूवल इन महाराष्ट्र ( अफार्म) , पुणे च्या माध्यमातून महाराष्ट्रातील कोरडवाहू जिल्ह्यात हा प्रकल्प राबविण्यात येत आहे.

यवतमाळ, अमरावती येथून एकाचवेळी प्रकाशित epaper- www.ematrubhumi.com eportal www.ematrubhumis.in

# मातृभूमि

अकोला । शुक्रवार ०२.१२.२०२२ » किंमत : ४ रूपये » वर्ष ९३ » अंक १४२

## अकोला जिल्हा

### यावलखेड, वरोडी, सांगळुद, धोतर्डी या गावांचा समावेश

# अल्पखर्चिक शाश्वत शेती तंत्रज्ञानासाठी चार गावांची सेवाधर्म संस्थेकडून निवड

मातृभूमि वृत्तसेवा

। अकोला, दि. १ ।

हवामानानुकूल-अल्पखर्चिक शाश्वत तंत्रज्ञान राबविण्यासाठी जिल्हानिहाय संस्थांची निवड केली असून, सेवाधर्म शिक्षण व बहुउद्देशीय संस्था अकोला या संस्थेनेयावलखेड, वरोडी, सांगळुद व वरोडी या चार गावांत अफार्मचे अध्यक्ष प्रमोद देशमुख, कार्यकारी संचालक सुभाष तांबोळी, प्रकल्प संचालक एस. एन. साकोरे यांच्या मार्गदर्शनाखाली हे अभियान ऑक्टोबर २०२२ ते सप्टेंबर २०२४ दरम्यान राबविण्यात येणार आहे.

यासाठी सेवाधर्म संस्थेचे अध्यक्ष प्रा. धनंजय कोठाळे व सचिव तुषार हांडे यांच्यासह समस्त संचालक मंडळ कार्यरत आहेत.

महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील ७० टक्के जन समुदायाची उपजीविका शेती व शेती संलग्न व्यवसायावर अवलंबून आहे. तथापि घटलेली उत्पादकता, एक पीक पद्धतीचा वापर, उत्पादन खर्चातील वाढ, अपुरा व त्रोटक वित्त पुरवठा, काढणी पश्चात प्रक्रिया व कृषी माल मूल्यवर्धनाचा, शेतीतील व्यावसायिकतेचा अभाव, बाजारभावातील अनिश्चितता, शेतीला जोडधंद्याचा अभाव, असंघटित शेतकरी तसेच अल्पखर्चिक शेती तंत्रज्ञान, कोरडवाहू अल्पभूधारक शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यात कृषी विस्तार यंत्रणांना लागत असलेला वेळ, कृषीविषयक शासकीय योजना अंमलबजावणीमध्ये होत असलेली दिरंगाई, लहरी पाऊस इत्यादी कारणामुळे शेती व शेती संलग्न व्यवसाय किफायतशीर होताना दिसत नाही. पर्यायाने ग्रामीण कुटुंबातील पिढीजात कृषी व्यवसायामधून बाहेर पडून बिगरशेती रोजगाराशी संबंधित संधीच्या शोधात शहराकडे वळताना दिसून येतो. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील लहान व अल्पभूधारक, आदिवासी महिला शेतकरी यांना केंद्रस्थानी ठेवून ग्रामीण कुटुंबाची उपजीविका सक्षम करण्यासाठी अफार्ममार्फत हवामान अनुकूल शेती एकात्मिक कृषी प्रणाली मजबुतीकरण व कृषी उद्योजकता विकास इत्यादी उपक्रम हाती घेण्यात आले आहेत. यांतर्गत महाराष्ट्रातील कोरडवाहू भागातील छोट्या, अल्पभूधारक शेतकऱ्यांसाठी काम करणाऱ्या निवडक अफार्म सदस्य व इतर संस्थेच्या कार्यकर्त्यांचे अल्पखर्चिक शेती तंत्रज्ञानविषयी क्षमतावर्धन व्हावे व त्यांच्या माध्यमातून कोरडवाहू भागातील छोट्या, अल्पभूधारक शेतकऱ्यांपर्यंत अल्पखर्चिक शेती तंत्रज्ञान पोहोचावे, यासाठी आखणी करण्यात आली आहे.

पावसाच्या पाण्यावर अवलंबून असलेल्या शेतीचे उत्पन्न वाढीसाठी बदलत्या हवामानानुसार, कमी खर्चात जास्त उत्पादन मिळविण्यासाठी जमिनीतील ओलावा संवर्धन पद्धती, मातीचे आरोग्य सुधारण्यास मदत, स्थानिक वनस्पती संरक्षण उपाय, एकात्मिक पोषक आणि कीटक व्यवस्थापन, सेंद्रिय शेतीसाठी पशुधन संगोपनाची गरज आदी प्रमुख विषयांवर ॲक्शन फॉर अॅग्रीकल्चर रिन्यूवल इन महाराष्ट्र (अफार्म), पुण्याच्या माध्यमातून महाराष्ट्रातील कोरडवाहू जिल्ह्यात हा प्रकल्प राबविण्यात येत आहे.

मुंबई, पुणे, नाशिक, नागपूर येथून एकाच वेळी प्रकाशित

पत्रसमूह संस्थापक : स्व. श्री. रामगोपाल माहेश्वरी

# नवराष्ट्र

नवभारत पत्रसमूहाचे मराठी वृत्तपत्र

नागपूर, शुक्रवार, 2 डिसेंबर 2022 | www.navarashtra.com | /navarashtra

## अल्पखर्चिक शाश्वत शेती तंत्रज्ञानासाठी 4 गावांची निवड

### यावलखेड, वरोडी, सांगळूद, धोतर्डीचा समावेश

**अकोला, ब्युरो.** हवामानानुकूल अल्पखर्चिक शाश्वत तंत्रज्ञान राबविण्यासाठी जिल्हानिहाय संस्थांची निवड केली असून सेवाधर्म शिक्षण व बहुउयुद्धेशिय संस्था अकोला या संस्थेने यावलखेड, **वरोडी**, सांगळुद व वरोडी या चार गावात **अफार्मचे** अध्यक्ष प्रमोद देशमुख, कार्यकारी संचालक सुभाष तांबोळी, प्रकल्प संचालक एस. एन. साकोरे यांच्या मार्गदर्शनात हे अभियान ऑक्टोबर 2022 ते सप्टेंबर 2024 दरम्यान राबविण्यात येणार आहे.

यासाठी सेवाधर्म संस्थेचे अध्यक्ष प्रा. धनंजय कोठाळे व सचिव तुषार हांडे यांचेसह समस्त संचालक मंडळ कार्यरत आहे. महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील 79 टक्के जनसमुदायाची उपजीविका शेती व शेती सलग्न व्यवसायावर अवलंबून आहे. तथापि घटलेली उत्पादकता, एक पीक पध्दतीचा वापर, उत्पादन खर्चातील वाढ, अपुरा व त्रोटक वित्त पुरवठा, काढणी पश्चात प्रक्रिया व कृषी माल मूल्यवर्धनाचा, शेतीतील व्यावसायिकतेचा अभाव, बाजारभावातील अनिश्चितता, शेतीला जोडधंद्याचा अभाव, असंघटित शेतकरी तसेच अल्पखर्चिक शेती तंत्रज्ञान कोरडवाहू अल्पभूधारक शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यात कृषी विस्तार यंत्रणाना लागत असलेला वेळ, कृषीविषयक शासकीय योजना अंमलबजावणीमध्ये होत असलेली दिरंगाई, लहरी पाऊस आदी कारणांमुळे शेती व शेती संलग्न व्यवसाय किफायतशीर होतांना दिसत नाही. पर्यायाने ग्रामीण कुटुंबातील पिढीजात कृषी व्यवसायामधून बाहेर पडून बिगरशेती रोजगाराशी संबंधित संधीच्या शोधात शहराकडे वळताना दिसून येतो. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील लहान व अल्पभूधारक, अदिवासी महिला शेतकरी यांना केंद्रस्थानी ठेवून ग्रामीण कुटुंबाची उपजीविका सक्षम करण्यासाठी अफार्ममार्फत हवामान अनुकूल शेती एकात्मिक कृषीप्रणाली मजबूतीकरण व कृषी उद्योजकता विकास आदी उपक्रम हाती घेण्यात आले आहेत. याअंतर्गत महाराष्ट्रातील कोरडवाहु भागातील छोट्या, अल्प भूधारक शेतकऱ्यांसाठी काम करणाऱ्या निवडक अफार्म सदस्य व इतर संस्थेच्या कार्यकर्त्यांचे अल्पखर्चिक शेती तंत्रज्ञानविषयी क्षमता वर्धन व्हावे व त्यांच्या माध्यमातून कोरडवाहू भागातील छोट्या, अल्पभूधारक शेतकऱ्यांपर्यंत अल्प खर्चिक शेती तंत्रज्ञान पोहोचावे यासाठी आखणी करण्यात आली आहे.



### कोरडवाहू जिल्ह्यात प्रकल्प राबविणार

**पावसाच्या पाण्यावर अवलंबून असलेल्या शेतीचे उत्पन्न वाढीसाठी बदलत्या हवामानानुसार, कमी खर्चात जास्त उत्पादन मिळविण्यासाठी जमिनीतील ओलावा संवर्धन पद्धती, मातीचे आरोग्य सुधारण्यास मदत, स्थानिक वनस्पती संरक्षण उपाय, एकात्मिक पोषक व कीटक व्यवस्थापन, सेंद्रीय शेतीसाठी पशुधन संगोपनाची गरज आदी विषयांवर 'ऍक्शन फॉर अग्रीकल्चर रिन्यूवल इन महाराष्ट्र' ( अफार्म) पुणेच्या माध्यमातून महाराष्ट्रातील कोरडवाहू जिल्ह्यात हा प्रकल्प राबविण्यात येत आहे.**